!! प्रेसनोट !! दि.१८/०४/२०२४

# १९३० सायबर हेल्पलाईन, मुंबईने दक्षिण मुंबईतील व्यवसायिकाची सायबर गुन्हयात फसवणुक झालेली संपुर्ण रक्कम रूपये ३५,१२,८२०/- वाचविण्यात यश.

मुंबई शहरातील नागरीकांची सायबर गुन्हयामध्ये फसवणुक झालेली रक्कम सबंधित बॅक खात्यामध्ये गोठविण्याकरीता मुंबई पोलीस गुन्हे शाखे अंतर्गत १९३० हेल्पलाईन कार्यान्वित करण्यात आली आहे. याद्वारे सायबर गुन्हयात आर्थिक फसवणुक झालेले तक्रारदार यांनी त्यांची फसवणुक झालेनंतर १९३० हेल्पलाईनवर तात्काळ संपर्क केला असता, त्यांची फसवणुक झालेली रक्कम सबंधित बॅक खात्यांवर गोठविण्यात येते.

दिनांक १३/०४/२०२४ दक्षिण मुंबईमध्ये राहणारे व्यवसायिक यांना आरोपीतांनी ते स्वतः पोलीस अधिकारी, आयकर अधिकारी असल्याचे सांगुन फिर्यादी यांचे नावे Fedex Courier आलेले असून त्यांच्या बॅक अकाऊंटमध्ये अनाधिकृत ट्रांन्झेक्शन केल्याचे सांगितले व त्यांना रूपये **३५,१२,८२०/-** ट्रान्सफर करण्यास भाग पाडले.

सदर प्रकरणी फसवणूक झाल्याचे लक्षात येताच फिर्यादी यांनी तत्काळ १९३० सायबर हेल्पलाईनवर संपर्क करून माहीती दिली. त्यावरून पोउनि भोर व पो.शि. ०८०५९१/ किरण पाटील यांनी तात्काळ **NCRP PORTAL** वर तक्रार दाखल करून संबधित बॅकेच्या नोडल अधिकारी यांच्याशी संपर्क साधून केलेल्या कार्यवाहीमुळे तक्रारदार यांची सायबर गुन्हयात फसवणूक झालेली संपुर्ण रक्कम **रूपये ३५,१२,८२०/-** संबधित बॅक खातेवर होल्ड करण्यात १९३० हेल्पलाईन पथक, गुन्हे शाखा, मुंबई यांना यश आले आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री. लखमी गौतम, पोलीस सह आयुक्त, गुन्हे, मा. श्री. शशीकुमार मिना, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री. दत्ता नलावडे, पोलीस उप आयुक्त, सायबर गुन्हे, मा. श्री. आबुराव सोनावणे, सहा. पोलीस आयुक्त, सायबर गुन्हे विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. दत्ताराम चव्हाण, व.पो.नि. पश्चिम प्रा. सायबर पो. ठाणे. पोउनि मंगेश भोर, पो.शि. ०८०५९१/ किरण पाटील यांनी पार पाडली आहे.

तरी नागरीकांना अहवान करण्यात येते की, त्यांनी सायबर गुन्हयामध्ये आर्थिक फसवणुक झाल्यास तात्काळ १९३० हेल्पलाईनवर संपर्क करावा जेणेकरून आपली फसवणूक झालेली संपुर्ण किंवा जास्तीत जास्त रक्कम वाचली जाईल.

## Fedex Scam किंवा इतर कुरीयर कंपनीचे नावे Scam प्रकारच्या गुन्हयापासुन वाचण्याकरिता नागरीकांनी खालील काळजी घ्यावी.

- अग्रनामांकित कुरीयर कंपन्याचे प्रतिनीधी असल्याचे भासवून आपले बॅक खात्यांमधुन अनियमित व्यवहार झाल्याचे किंवा आपले नावे ड्रग्स, हत्यारे, हवाला ट्रान्झेक्शन झाल्याचे सांगुन येणारे कॉल हाताळतांना सावधानता बाळगावी.

- पोलीस अधिकारी, इन्कम टॅक्स अधिकारी किंवा इतर सरकारी अधिकारी असल्याची बतावणी करून सोशल मिडीयाचे माध्यमातून ओळखपत्र किंवा नोटीस पाठवून आपल्याला अटक करण्यात येईल असे भय दाखवले गेल्यास योग्यती शहानिशा करून तसेच घाबरून न जाता नजिकच्या पोलीस ठाणेस संपर्क करावा.
- संभ्रमित होवून कोणतेही आर्थिक व्यवहार करू नये किंवा अनोळखी व्यक्तीस व बॅक खातेवर पैसे पाठवू नये.
- कोणत्याही प्रकारे आर्थिक फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तात्काळ सायबर हेल्पलाईन १९३० संपर्क साधावा.

**# cybersafemumbai**

**Report Cyber Crime On Helpline 1930 OR https://cybercrime.gov.in**